# फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १९७/२०२२ मधील नि.१ वरील आदेश

CNR MHRT080007682022

**आशुतोष रामस्नेही राज,**
**रा. रू. नं २१५, भागीरथी चाळ, टी जे रोड,**
**न्यू चायना मिल जवळ, शिवडी, मुंबई** -----**अर्जदार**
**सध्या राहणार- वाटद, खंडाळा, ए एस आर कंपनी,**
**ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.**

**--विरुध्द--**

**महाराष्ट्र शासन करीता पो.नि. संगमेशवर पोलिस ठाणे,**
**संगमेश्वर.**
**ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.** -----**गैरअर्जदार**

१. अर्जदार **आशुतोष रामस्नेही राज**, यांनी फौ.प्र.सं. १७७३ चे कलम ४५७ प्रमाणे देवरुख पो.ठाणे गु.र.नं. १२९/२०२१ मधील जप्त मुद्देमाल म्हणजे त्या कंपनी च्या ट्रक चे चोरीस गेलेले पार्टस खालीलप्रमाणे परत मिळवण्याकरीत केलेल आहे.

२. अर्जदाराच्या कथनानुसार पुढील वर्णनाप्रमाणे मुद्देमाल सध्या जप्त आहे.

अ) ट्रक क्रमांक एम एच ०४ एफ जे ४१८८ चे पुढील पाट्र्स चोरीस गेले होते

1. रु. ३०,००० चे दोन टायर ब्रिस्टोन कंपनीचे जुने वापरते
2. रु. २,००० चे ट्रक चे जॅक
3. रु. १०,००० चे एक स्टेपणी टायर ब्रिजस्टोन कंपनी चे डिस्क सह
4. रु. ७००० चे दोन ट्रक च्या चार्जिंग बॅटरी ॲमरॉन कंपनी च्या

ब) ट्रक क्र एम एच ०६ बी डी ३०९७ चे पुढील पाट्‌र्स

1. रु ३०,००० चे दोन टायर ब्रिस्टॉन कंपनी चे
2. रु. २००० चे ट्रक चे जॅक
3. रु. १०,००० चे एक स्टेपनी टायर ब्रिस्टोन कंपनीचे डिस्क सह
4. रु. ७००० चे दोन ट्रक च्या चार्जिंग बॅटरी ॲमरॉन कंपनी च्या

क) ट्रक क्र एम एच ०४ ए एफ ४१८७ चे पुढील पाट्‌र्स

1. रु ३०,००० चे दोन टायर ब्रिस्टॉन कंपनी चे
2. रु. २००० चे ट्रक चे जॅक
3. रु. १०,००० चे एक स्टेपनी टायर ब्रिस्टोन कंपनीचे डिस्क सह
4. रु. ७००० चे दोन ट्रक च्या चार्जिंग बॅटरी ॲमरॉन कंपनी च्या

ख) ट्रक क्र एम एच ०४ एफ डी २३८८ चे पुढील पाट्‌र्स

1. रु २००० ट्रक चे जॅक
2. रु. ७००० चे दोन ट्रक च्या चार्जिंग बॅटरी ॲमरॉन कंपनी च्या

जप्त मुद्देमाल हा अर्जदार काम करत असलेल्या ए एस आर कन्स्ट्रकशन कंपनी च्या ट्रक च्या रोजच्या वाप्रतील आहे. तसेच हा मुद्देमाल अर्जदार काम करत असलेल्या कंपनी चा आहे. हा मुद्देमाल अर्जदारच्या देखरेखीखालील होता. सबब अर्जदार या मुद्देमालचा हक्कादार आहे. सदारचा मुद्देमाल हा रे. के. नं ०२/२०२२ या केसकामी संगमेश्वर पोलिस स्टेशन च्या आवारात मोकळ्या जागेत पडून आहे. हा मुद्देमाल तसच पडून राहिल्यास तो गणून सडून जाऊन त्याच्या वापर न झाल्यास तो खराब होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास भविष्यात अर्जदारस हा मुद्देमाल कंपनी कमी वापरण्यास योग्य राहणार नाही. अर्जदार व तो काम करत असलेल्या कंपनीचे अपरिमित असे आर्थिक व व्यावसायिक नुकसान होणार आहे. या गुन्ह्याच्या कामी अर्जदारचा काहीही संबंध नाही. मात्र या केसचा निकाल होण्यासाठी बरच कालावधी लागणार आहे. या काळात मुद्देमाल खराब होण्याची शक्यता आहे. जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात मिळाल्यास तो त्यामध्ये कोणताही

बदल करणार नाही वा कोणासही तबदील करणार नाही याउलट ताबा न मिळाल्यास त्याचे अपरीमित असे नुकसान होणार आहे. सबब अर्जदाराचे असे म्हणणे आले की, मे.न्यायालय ज्या अटींवर जप्त मुद्देमाल ताब्यात देण्यास आदेश देईल त्या सर्व अटी अर्जदार पाळण्यास तयार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने दाखल केला.

३. या प्रकरणात सरकारी वकीलांनी मुद्देमाल परत देण्याबाबत हरकत घेतली. तसेच तपासिक अंमलदार यांनी देखील नि.५खाली त्याचे म्हणणे दाखल करुन मुद्देमाल योग्य त्या अटीवर देण्यास त्यांची हरकत नसल्याचे कळवले.

४. सरकारी वकीलांच्या म्हणण्यानुसार जप्त मुद्देमाल हा घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेला आहे. तो साक्षीपुराव्याचा एक भाग आहे. जप्त मुदेमाल साक्षीच्या वेळी दाखवणे आवश्यक आहे. मुद्देमालचा ताबा अर्जदारास दिल्यास तो मुद्देमालात बदल करण्याची, त्रयस्थ व्यक्तीला विकण्याची, गहाण ठेवण्याची तसेच पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्हयात वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी योग्य त्या अटींवर हा मुद्देमाल अर्जदारस देण्यात यावा.

५. तपासिक अंमलदार उदय झांवरे, संगमेश्वर पो.ठाणे यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारस योग्य त्या अटी शर्थी वर मुद्देमाल परत करण्यास हरकत नाही.

६. फौजदार प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये हा अर्ज निकाली काढण्यासाठी खालील महत्वाच्या गोष्टी विचारात घेणे गरजेचे आहे.

| | | |
|---|---|---|
| अर्जदाराचे नाव | | आशुतोष रामस्नेही राज, |
| राहणार | :- | रा. रू. नं २१५, भागीरथी चाळ, टी जे रोड,<br>न्यू चायना मिल जवळ, शिवडी, मुंबई<br>सध्या राहणार- वाटद, खंडाळा, ए एस आर कंपनी,<br>ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| ज्या गुन्हयामध्ये वाहन जप्त आहे त्याचा सी. आर. नंबर | :- | १२९/२०२१ |
| गुन्हा ज्या कलमाखाली घडला | :- | भा.दं.वि.का.कलम ३७९, ३४ |

| | | |
|---|---|---|
| आहे ते कलम | | |
| अर्जदार नोंदणीकृत मालक आहे काय? | :- | होय |

७. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले.

८. दोन्ही पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

९. अर्जदाराने त्याच्या अर्जाच्या पुष्टयर्थ खालील कागदोपत्री पुरावे दाखल केले आहेत.

a) अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र नि. २

b) संगमेश्वर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १२९/२०२१ मधील F.I.R. ची प्रत.

d) अर्जदाराच्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत.

१०. सदरचा मुद्देमाल हा पोलीसांनी प्रस्तुत गुन्हयामध्ये जप्त केल्याची बाब वादातित नाही. तसेच अर्जदाराने सादर केलेल्या वर नमुद कागदपत्रावरुन सदर जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा मिळणेकरीता अर्जदार पात्र असल्याचे प्रथम दर्शनी दिसते. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता अर्जदार हाच जप्त मुद्देमालाचा हक्कदार असल्याचे स्पष्ट दिसते. तपासिक अंमलदाराच्या म्हणण्यावरुन हे स्पष्ट होते की, सदरचा मुद्देमाल हे पुढील तपास कामासाठी आवश्यक नाही आहे. तसेच जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यामध्ये बराच काळ एकाच स्थितिमध्ये पडून राहिले असल्यास त्याला बिघाड होण्याची शक्यता नाकारात येत नाही. सबब सदरचे मुद्देमाल जप्त करुन ठेवणे हे योग्य नाही. मुद्देमालाचा ताबा हा पोलिसांना तपास कामासाठी गरजेचा नाही. तसेच आजतागायत जप्त मालाचा ताबा कोणी दुस-या व्यक्तिने मागितला नाही. उलट मुद्देमालाचा अर्जदार हाच एकमेव हक्कदार आहे.

११. मा. उच्च न्यायालयाच्या ***सुंदर भाई विरुध्द गुजरात राज्य (2003) 24 OCR (SC) 444*** या निकालानुसार गुन्हयाकामी जप्त केलेला मुद्देमाल जास्त काळ पोलीस स्टेशनच्या आवारात ठेवणे गरजेचे नाही व त्यासंदर्भातच संबंधित न्यायालयाने मुद्देमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास देण्याबाबत आदेश

करणे गरजेचे आहे. सदरच्या न्यायनिवाडयानुसार मुद्देमालाचा ताबा देत असताना अर्जदाराकडून योग्य ते बंधपत्र आणि जप्त मुद्देमाल साक्षी पुराव्याच्या वेळी लागत असल्यास त्याबाबत सिक्युरिटी देणे गरजेचे आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता अर्जदाराचे ताब्यात प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमाल देणे योग्य ठरेल. अशा परिस्थितीमध्ये जप्त मुद्देमाल काही अटी व शर्तीवर अर्जदाराचे ताब्यात देणे योग्य होईल म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. पोलीस निरीक्षक, संगमेश्वर पोलीस ठाणे, यांना आदेश देण्यात येतो की अर्जदाराच्याा अर्जतील परिशीष्ठ क्र. २ मधील १ ते ४ वर्णनाचा मुद्देमाल हा अर्जदारास सुमारे रककम रुपये १,५६,०००/- (एक लाख छप्पन्न हजार रुपये मात्र ) चे हमीपत्र दिल्यानंतर परत देण्यात यावी.

३. तपासिक अंमलदार यांनी सदरचा मुद्देमाल अर्जदारास परत करण्यापूर्वी गाडीचे चार बाजुने फोटो काढून त्याबाबत पंचनामा करावा. असा पंचनामा व फोटो त्यांचे निगेटिव्ह सह तथा योगय त्या प्रमाणपत्रासह या न्यायालयात आदेशापासून १० दिवसाच्या आत दाखल करावे. या सर्व प्रक्रियेचा खर्च प्रस्तुत अर्जदाराने करावा.

४. अर्जदाराने जप्त मुद्देमाल ताब्यात मिळाल्यानंतर या केसच्या अंतिम निकालापर्यंत ते कोणालाही विकु नये अथवा त्यामध्ये कोणताही बदल करु नये.

५. अर्जदाराने सदरचा मुद्देमाल मे. न्यायालयास जेव्हा जेव्हा चौकशीकामी आवश्यकता असले तेव्हा तेव्हा मे. न्यायालयात स्वखर्चाने हजर करावेत.

६. मुद्देमालाचा सुपुर्तनामा अर्जदाराने तपासिक अंमलदाराच्या समोर कार्यान्वीत करावा व त्याची कॉपी या न्यायालयात चार्जशिटसोबत दाखल करावी.

७. या प्रकरणातील कागदपत्रे संगमेश्वर पोलीस ठाणे मधील गुन्हा रजि. नं. १२९/२०२१ सोबत ठेवण्यात यावीत तसेच सर्व संबंधित कागदपत्रे तपासिक अंमलदाराने अंतिम अहवालासोबत दाखल करावीत व त्यामध्ये मुद्देमाल परत केलेबाबतचा उल्लेख असावा असा आदेश तपासिक अंमलदारांना देण्यात येतो.

८. वरील विषयास अनुसरुन संबंधित पोलीस ठाण्यास पत्र पाठवावे.

९. सहाय्यक अधिक्षक यांना निर्देशित करण्यात येते की त्यांनी कागदपत्रांची नियमानुसार पडताळणी करावी.

१०. अर्ज निकाली लावण्यात येतो.

**(सदर आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला )**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2022.12.16 18:30:03 +0530

**स्थळ - देवरुख.** **(श्रुती ह. पाटील)**
**दि. १५/१२/२०२२** **न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवरुख.**

## CERTIFICATE

order in Cr.M.A. no. 197-2022

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. V. Vaje (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 15/12/2022 |
| Order signed by the presiding officer on | : | 15/12/2022 |
| Order uploaded on | : | 16/12/2022 |